# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/08/2023 (सोमवार) सकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा कढोली येथे दिनांक १२/०८/२०२३ चे ०७.०० वा. ते दिनांक २०/०८/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे– संदिप पंढरी लिचडे, वय ३८ वर्ष रा. गंगाबाग पारडी नागपूर हे काम करीत असलेल्या कंपनी मधील आयसर ट्रक मॉडल क्र. ६०४० प्रो. गाडीचे मागचे ४ डिस्क सह टायर प्रत्येक टायर किंमती २४०००/–रू प्रमाणे एकुण ९६०००/–रू चे टायर कोणीतरी अज्ञात चोराने दिनांक १२/०८/२०२३ चे ०७/०० वा. ते दिनांक २०/०८/२०२३ चे ११/०० वा. चोरून नेले आहेत.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नागेश वाघाडे मो. क्र. ८९७५५४२४४३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा खुटांबा शिवार येथे दिनांक १९/०८/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक २०/०८/२०२३ चे १०.१५ वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे– दिनेश रामकृष्ण निंबाळकर, वय. ४३ वर्ष रा. कडु लेआउट पंचवटी काटोल याचे खुटांबा तलावावरती खुटांबा मच्छीमार सहकारी संस्था मर्या. काटोल ही संस्था नोंदणी कलेली असुन फिर्यादीला मासेमारी करिता ठेक्याने मिळालेला आहे. पावसाळयात तलाव ओव्हर फ्लो होवुन मासे जाण्याची शक्यता असल्याने फिर्यादीने १७५ फुट लांबीचे जाळे किंमती ९०००/– रू. व नायलॉन दोर किंमती ३०००/– रू. असा एकुण १२०००/– रू. किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आगासे पो.स्टे. काटोल हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर